**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२४/०९/२०२६

***'श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६' अंतर्गत महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत आयोजित आरोग्य शिबिरांना नागरिकांचा मोठा प्रतिसाद***

मा.मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतून तसेच मा.मुख्यमंत्री सचिवालयाच्या अधिनस्त मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीगणेशोत्सवानिमित्त "श्री गणेशा आरोग्याचा अभियान २०२६" संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. वसई विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फतही महानगरपालिका कार्यक्षेत्रात सदर अभियान दि.१४ सप्टेंबर पासून राबविण्यात आले असून अभियानांतर्गत महानगरपालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, रुग्णालये त्याचप्रमाणे नोंदणीकृत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या आरोग्य शिबिरांमध्ये नागरिकांच्या गरजेनुसार विविध आरोग्य तपासणी करण्यात येऊन त्यांना योग्य ते औषधोपचार तसेच आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. आरोग्य तपासणीदरम्यान आवश्यकतेनुसार नागरिकांना आजाराबाबत मार्गदर्शन, प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती, आहार व जीवनशैलीविषयक सूचना तसेच पुढील वैद्यकीय तपासणी व उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे. आरोग्य शिबिरांमध्ये तपासणीदरम्यान ज्या नागरिकांना पुढील वैद्यकीय तपासणी किंवा उपचारांची आवश्यकता आढळून येते, अशा नागरिकांना संबंधित आरोग्य सुविधांकडे पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात येत आहे. गंभीर अथवा तातडीच्या वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना आवश्यकतेनुसार पुढील वैद्यकीय सेवेसाठी संदर्भित करण्यात येत आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत दि.२३ सप्टेंबर पर्यंत एकूण ७१३ आरोग्य शिबिरे राबविण्यात आली असून एकूण ४३७२० नागरिकांनी शिबिरांना भेट देऊन या आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला आहे. यामध्ये १८१०५ पुरुष, २१३५४ महिला व ४२७१ बालकांचा समावेश आहे. या आरोग्य शिबिरांमध्ये हृदयविकार, अस्थिविकार, बालरोग, स्त्रीरोग, कान-नाक घसा तपासणी, नेत्रविकार, रक्त तपासणी, त्वचा विकार, इतर व्याधी यांची तपासणी केली जात आहे. त्याचप्रमाणे यावेळी आभा कार्ड (ABHA Card), वयोवंदना कार्ड, आयुष्यमान कार्ड इ.बाबतची नोंदणीही करण्यात आली.